# MyCARE

With me, every step of the way




“इन्सुलिनसह आनंददायक आणि आरामशीर प्रवासाचा अनुभव घेण्यासाठी पूर्वतयारी करणे आणि सावधगिरी बाळगणे महत्त्वाचे असते”

USV

# प्रवासापूर्वीची पूर्वतयारी


# प्रवासापूर्वी 4-6 आठवडे आधी तुमच्या डॉक्टरांना भेटून खालील गोष्टींची माहिती घ्या

- आवश्यक लसीकरणे
- इन्सुलिनसंबंधीचे बदल (अॅडजस्टमेंटस)
- तुमच्या सध्याच्या आरोग्य स्थितीबद्दलची वैद्यकीय कागदपत्रे
- तीक्ष्ण उपकरणे (सुया, लॅन्सेटस् इ.) बरोबर बाळगण्याची गरज




## उड्डाणाला उशीर झाला तर किंवा तेथील निवास वाढला तर पुढील गोष्टी नेहमीपेक्षा जास्त प्रमाणात बरोबर नेणे योग्य ठरेल

- इन्सुलिन व्हायल (बाटली) / कार्टरिजेस
- सिरिंजेस /पेन्स
- हायपो–किट साहित्य
- ग्लूकोमीटर पट्ट्या
- लघवी/ रक्त केटोन तपासणी पट्ट्या



नेहमी इन्सुलिनचा पुरवठा दोन
वेगवेगळ्या बॅग्जमध्ये ठेवावा
म्हणजे सामान हरवल्यास
धोका कमी होईल




जिथे जाणार तेथील हवामानाच्या स्थितीनुसार **योग्य कपडे आणि पादत्राणे बरोबर न्या**



# प्रवासादरम्यान इन्सुलिनची साठवणूक करणे


## इन्सुलिन अतीतीव्र तापमानाबाबत संवेदनशील असल्यामुळे, ते पुढील ठिकाणी ठेवू नये

- फ्रीजर
- बर्फावर थेटपणे ठेवणे
- थेट उन्हात (सूर्यप्रकाशात)
- मोटारीच्या ग्लोव्ह कंपार्टमेंटमध्ये






इन्सुलिन व्हायल/पेन **विशेष इन्सुलेटेड किंवा कूलिंग पाऊचेसमध्ये** ठेवावे,
जे सहजपणे उपलब्ध
असतात




विमानाने प्रवास करताना हँड लगेजमध्ये ठेवावे, म्हणजे सामान ठेवण्याच्या जागेतील शून्यपेक्षा कमी तापमानामुळे होणारे नुकसान टाळता येईल




# वेगवेगळ्या टाइम-झोन्समधून प्रवास करताना इन्सुलिनबद्दलच्या ॲडजस्टमेंट्स

जर तुम्ही **पश्चिमेकडून पूर्वेकडे प्रवास करत असाल** तर इन्सुलिनची गरज कमी प्रमाणात भासू शकेल कारण दिवस लहान होत जातात



जर तुम्ही **पूर्वेकडून पश्चिमेकडे प्रवास करत असाल** तर तुम्हाला इन्सुलिनची जास्त गरज भासू शकेल कारण दिवस मोठे होत जातात



जर तुम्हाला वेगवेगळ्या टाइम झोन्समध्ये प्रवास करायचा असेल तर प्रवासापूर्वी खूप आधी तुम्हाला तुमच्या डॉक्टरांबरोबर इन्सुलिन घेण्याच्या वेळा व प्रमाण (डोस) यांबद्दल बोलावे लागेल.




# इन्सुलिनमधील बदल (ॲडजस्टमेंटस) पुढील गोष्टींवर अवलंबून असतील


विमानप्रवासाचा कालावधी




टाइम झोन बदलताना किती तासांचा बदल होणार आहे




जेवण व स्नॅक्सच्या वेळा




लेओव्हर्स
(दोन विमानप्रवासांच्या मध्ये थांबण्याचा वेळ)




इन्सुलिन डोस (मात्रा) ची नेहमीची पद्धत



प्रवास संपण्याच्या ठिकाणी कोणत्या वेळी पोचणार




दिवसभरातील कार्यक्रम



# आंतरराष्ट्रीय देशांमध्ये इन्सुलिन खरेदी करणे

तुम्ही ज्या देशांमध्ये प्रवास करणार आहात तेथे उपलब्ध असणाऱ्या विविध इन्सुलिन कॉँसंट्रेशन्सबद्दल **तुम्हाला माहिती असली पाहिजे.**


**यू-40, यू-100** किंवा **यू-80** काही देशांमध्ये उपलब्ध असू शकते




**टीप:** गरजेपेक्षा जास्त किंवा कमी इन्शुलिन दिले जाण्याचा धोका टाळण्यासाठी योग्य सिरींजचा उपयोग कॉँसंट्रेशननुसार केला पाहिजे.

# स्वयं-देखभालीसाठी सूचना

नेहमी तुमचे डायबेटिस आयडेंटिटी कार्ड (मधुमेह ओळखपत्र) आणि डॉक्टरांनी अलिकडेच दिलेले प्रिस्क्रिप्शन तुमच्याबरोबर ठेवा




तुम्हाला विमानतळावर सेक्युरिटी चेकच्या वेळी लागू शकतील

**अशी संबंधित कागदपत्रे तुमच्याबरोबर बाळगा**




प्रवासादरम्यान आणि तुम्हाला जिथे जायचे आहे त्या ठिकाणी **खाण्याचे कोणते पर्याय उपलब्ध आहेत ते जाणून घ्या** म्हणजे तुम्हाला आरोग्यदायी आणि वेळेवर आहार करण्याचे नियोजन करता येईल



**टीप:** तुमच्याबरोबर काही आरोग्यदायी स्नॅक्स (खाद्यपदार्थ) बाळगा

**रक्त शर्करेवर लक्ष ठेवा** कारण तुमच्या नेहमीच्या रूटीनमध्ये, वेळांमध्ये, आहारामध्ये आणि प्रवासात हालचाली वाढल्यामुळे किंवा कमी झाल्यामुळे रक्त शर्करा वाढू शकते किंवा कमी होऊ शकते



“अधिक माहितीसाठी तुमच्या
डॉक्टरांशी किंवा तुमच्या
**MyCARE डायबेटिस एज्युकेटरशी**
संपर्क साधा.”



# MyCARE

With me, every step of the way

## Reference


- Diabetes Management during travel. Accessed from: https://www.openaccessjournals.com/articles/Diabetes-management-during-travel.pdf

- Toschi.E. Safe and effective use of Insulin requires proper storage. December 4, 2018. Harvard medical school. Available at: Safe and effective use of Insulin requires proper storage - Harvard Health. Accessed March 30, 2022

- Foronoville E. How to keep Insulin cold while travelling. January 26, 2021. Available at How to keep Insulin cold while travelling – Diabetic & Me (diabeticme.org). Accessed March 30, 2022


Issued in Public Interest by USV

The guide/presentation/content/literature is for general information, guidance and educational purposes only and is not complete or exhaustive. The guide /presentation/content/literature is not intended or implied to replace or substitute any current practice and or advice/guidance/diet provided by healthcare professionals. This guide/presentation/content/literature does not constitute any treatment/therapy/medication/diet/opinions for any patients who are on diabetes medication, the patients are required to prior consult their healthcare professional before acting on any change on treatment/therapy/ medication/diet and/or opinions. USV Private Limited makes no representations as to accuracy, completeness, correctness, suitability or validity of any information contained in this guide/presentation/content/ literature and will not be liable for any losses, injuries or damages arising from its use.

USV